# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. ०३/०३/२०१७

## पोलीस व जनता यांच्या सहकार्य व श्रमदानातून झुरी नाल्यावरील पुलाची दुरूस्ती

गडचिरोली जिल्हयामध्ये जनतेच्या सोयी सुविधांसाठी व त्यांच्या विकासासाठी पोलीस विभाग सदैव तत्पर असतो. येथील जनतेला येणाऱ्या दैनंदिन जीवनातील अडचणी सोडविण्यासाठी सुद्धा पोलीस स्थानिक पातळीवर काम करतांना दिसून येतात. जिल्हयामध्ये पोलीसांचा संबंध फक्त नक्षलवाद व गुन्हे इ. शी संबंधीत राहीला नसून जनसेवा हा नवीन दृष्टीकोन येथे पाहवयास मिळतो. यातुनच पोमके हालेवारा येथील अधिकारी व कर्मचारी तसेच सीआरपीएफ व एसआरपीएफ चे अधिकारी व कर्मचारी आणि परीसरातील लोकांनी श्रमदानातुन झुरी नाल्यावरील पुलाची दुरूस्ती करून लोकांनी पोलीसांच्या जनसेवा कार्याचा प्रत्यय घेतला.

उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके हालेवारा हद्दीतील हालेवारा ते एटापल्ली रस्त्यावरील झुरी नाल्याच्या पुलाजवळ मोठा खड्डा पडल्यामुळे सदरचा रस्ता अतिशय खराब झाला होता. तसेच पावसाळयामध्येही यावरून ये-जा करणे धोक्याचे झाले होते. त्यामुळे गावातील लोकांना दळणवळणाच्या मोठया समस्येला नेहमीच सामोरे जावे लागते. या समस्येवर तोडगा म्हणून देवदा, हालेवारा या गावातील नागरिकांनी पोमके हालेवारा येथे प्रभारी अधिकाऱ्यांना रस्त्याच्या दुरूस्ती बाबत सांगितले, तेव्हा मा. उपविभागीय पोलीस अधिकारी एटापल्ली श्री. नितीन जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोमके हालेवरा येथील सर्व पोलीस अधिकारी/कर्मचारी यांनी काल दिनांक ०२/०३/२०१७ रोजी हातात फावडे घेवून परीसरातून गावातील सर्व महीला, पुरुष, युवक असे एकूण १०० ते १२५ लोकांच्या मदतीने झुरी नाल्याच्या पुलाजवळील मोठा खड्डा दुरूस्त केला. या रस्ता बांधणीमध्ये पोमके हालेवाराचे अधिकारी श्री. शरद पाटील, पोउपनि अमोल काळे, १९१ बटालियन

सीआरपीएफचे असिस्टन्ट कमांडन्ट श्री. ब्रिजेशकुमार, एसआरपीएफ ग्रुप ११ चे पोउपनि श्री. गावंडे  व सर्व पोलीस कर्मचारी यांनी अथक श्रमदान करुन सदरचा रोड तयार केला. श्रमदानातून व सहकार्यातून मोठया वाटणाऱ्या समस्या सहज सोडविता येतात, असा संदेश जणू पोलीस दल व गावकऱ्यांनी सर्वांना दिला आहे.







